आजचा शुभ विचार

""बुद्धिमत्तेचा विकास हे मानवी अस्तित्वाचे अंतिम लक्ष्य असले पाहिजे"आपण नेहमी काहीतरी शिकत राहिले पाहिजे. आपले ज्ञान वाढविण्यावर भर दिला पाहिजे"
डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!






मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-22 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Friday 23 May 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक २२ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ शुक्रवार, दि. २३ मे २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये


# धुळे येथील शासकीय विश्राम गृहाच्या खोली क्रमांक १०२ मध्ये सापडले घबाड; माजी आमदार अनिल गोटे यांनी केला पर्दाफाश

## ही उद्धव ठाकरे गटाचीच खेळी असल्याचा आमदार खोतकारांचा आरोप

संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------



गुलमोहर शासकीय विश्रामगृहातून पाच कोटींची रोकड जप्त करण्यात आल्याचा आरोप उद्धव गटाने केला आहे. कंत्राट देण्याच्या बदल्यात कंत्राटदाराकडूनच लाच घेण्यात आली. ही रक्कम एका आमदाराने पीएच्या हाती सोपवण्याचे निर्देश कंत्राटदाराला दिले होते. आमदाराच्या सांगण्यावरुन कंत्राटदार रोख रक्कम घेऊन आला. पण आयत्यावेळी पोलिसांनी धाड टाकून रक्कम जप्त केली. जप्त केलेली रक्कम एकूण ११ आमदारांमध्ये वाटण्याचे नियोजन होते असाही आरोप उद्धव गटाने केला आहे. ज्या खोलीतून रक्कम जप्त झाली ती खोली आमदार अर्जुन खोतकर यांचे पीए किशोर पाटील यांच्या नावावर नोंदवलेली होती, असाही आरोप उद्धव गटाने केला आहे. उद्धव गटाचा आरोप आमदार अर्जुन खोतकर यांनी फेटाळला आहे. महाराष्ट्र शासन आणि राज्यातील आमदारांच्या समितीला बदनाम करण्यासाठी उद्धव गटानेच एक खेळी केल्याचा संशय आमदार अर्जुन खोतकर यांनी व्यक्त केला आहे. महाराष्ट्राच्या विधीमंडळाची अंदाज समिती तीन दिवसांच्या दौऱ्यासाठी धुळे जिल्ह्यात आहे. धुळ्यासह नंदुरबार जिल्ह्यातील विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा ही समिती घेणार आहे. समितीत २९ आमदार आहेत. या समितीचे नेतृत्व आमदार अर्जुन खोतकर करत आहेत. खोतकरांसह समितीचे ११ आमदार धुळे जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. याच आमदारांना लाच म्हणून देण्यासाठी पाच कोटींची रोकड गुलमोहर शासकीय विश्रामगृहात आणण्यात आली होती, असा आरोप उद्धव गटाचे माजी आमदार अनिल गोटे यांनी केला. तर ठोस पुरावे नसताना फक्त आरोपांची राळ उडवून देणे ही माजी आमदार गोटेंची जुनी खोड असल्याचा आरोप आमदार अर्जुन खोतकर यांनी केला आहे. विशेष म्हणजे उद्धव गटाच्या उपस्थितीत खोली क्रमांक १०२ ला कुलुप लावण्यात आले. पोलीस आल्यावर उद्धव गटाच्या उपस्थितीतच हे कुलुप काढून खोलीत तपासणी करण्यात आली. माजी आमदार अनिल गोटे यांनी पाच कोटींची रोकड आल्याचा आरोप केला. पण खोलीतून पोलिसांनी एक कोटी ८४ लाख २०० रुपये एवढीच रोकड जप्त केली आहे. खोलीत एवढेच पैसे होते, असे पोलिसांनी सांगितले.

# काँग्रेसचा माजी मंत्री शिंदेंच्या गळाला! सोलापूरमधील बालेकिल्ल्यालाच सुरुंग!

## शिंदेंच्या एका भेटीने काँग्रेसला हादरा?

राजेश यादव
सोलापूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------



सोलापुरातून एक मोठी आणि धक्कादायक राजकीय बातमी समोर येत आहे. देशाचे माजी गृहमंत्री आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, तसेच त्यांच्या कन्या खासदार प्रणिती शिंदे या दोघांनाही अचानक चकित करणारी ही घडामोड आहे. काँग्रेसचे अत्यंत विश्वासू आणि शिंदे कुटुंबियांचे निकटवर्तीय मानले जाणारे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी गृहराज्यमंत्री सिद्धराम म्हेत्रे यांनी एक असा निर्णय घेतला आहे, ज्याने सोलापूरच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. म्हेत्रे यांनी काँग्रेसला अखेरचा नमस्कार करत शिवसेना शिंदे गटात प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याची जोरदार चर्चा सध्या रंगली आहे. विशेष म्हणजे, त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची गुप्त भेट घेतल्याचे समोर आले असून, याच बैठकीनंतर त्यांच्या भूमिकेत बदल झाल्याचे सांगितले जात आहे. ज्यांनी एकेकाळी काँग्रेससाठी चार वेळा आमदारकी मिळवली, राज्याचे गृहराज्यमंत्री म्हणून काम पाहिलं ते म्हेत्रे आता धनुष्यबाण हाती घेणार? काँग्रेससाठी ही केवळ गळती नाही, तर त्यांच्या सोलापूरमधील बालेकिल्ल्यालाच सुरुंग लागल्याचा इशारा आहे. अनेक दशकांपासून काँग्रेसमध्ये कार्यरत असलेले म्हेत्रे आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश करणार आहेत. ३१ मे रोजी अक्कलकोटमध्ये एका जाहीर कार्यक्रमात ते अधिकृत प्रवेश करणार असल्याची माहिती समोर आली आहे.

### म्हेत्रेंचा शक्तीप्रदर्शनातून संदेश

म्हेत्रे यांनी नुकतीच सोलापूरच्या रेवणसिद्धेश्वर सांस्कृतिक भवनात बैठक घेऊन ताकद दाखवली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख महेश साठे, महिला आघाडीच्या अनिता माळगे आणि इतर स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव शिवसेनेत प्रवेश घेण्याचा निर्णय त्यांनी घेतल्याचे म्हेत्रे यांनी स्पष्ट केले.

### 'हा माझा नव्हे, कार्यकर्त्यांचा निर्णय'

माध्यमांशी बोलताना म्हेत्रे म्हणाले, "काँग्रेसने खूप काही दिलं, पण २००९ पासून आमचं वजन कमी करण्यात आलं. कार्यकर्त्यांनाही त्रास सहन करावा लागत होता. हा निर्णय माझा वैयक्तिक नाही, तर आमच्या सर्व कार्यकर्त्यांचा आहे." त्यांनी पुढे नमूद केले की, "शिंदे एक काम करणारा नेता आहे, म्हणून आमचे कार्यकर्ते म्हणाले, आता धनुष्यबाणच हाती घ्या."

### राजकीय इतिहास

सिद्धराम म्हेत्रे हे चार वेळा अक्कलकोट मतदारसंघातून आमदार झाले आहेत. त्यांनी राज्यात गृहराज्यमंत्री आणि ग्रामीण विकास राज्यमंत्री म्हणून काम पाहिले आहे. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना ते मंत्रिमंडळात होते. मात्र, सलग तीन वेळा झालेल्या पराभवानंतर ते नाराज होते. विशेष म्हणजे, प्रणिती शिंदे सोलापुरात दौऱ्यावर असतील, तर म्हेत्रे हमखास उपस्थित राहत असत. त्यामुळे त्यांच्या शिवसेना प्रवेशाने शिंदे आणि शिंदे गटाचे वजन सोलापूरात वाढणार आहे.

### काँग्रेसपुढे आव्हान

या आधी संग्राम थोपटे, रवींद्र धंगेकर यांसारख्या नेत्यांनीही काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली आहे. आता म्हेत्रेसारखा ज्येष्ठ नेता देखील जाणार असल्यामुळे सोलापुरात काँग्रेसची पकड खिळखिळी होण्याची चिन्हं आहेत. विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ आल्याने हा निर्णय काँग्रेससाठी डोकेदुखी ठरू शकतो.

# शिवसेना खा. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भारताचे शिष्टमंडळ पोहोचले मुस्लिम देशात

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------



शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील भारताचे सर्वपक्षीय शिष्टमंडळ 'ऑपरेशन सिंदूर' चा संदेश घेऊन मुस्लिम बहुल देश UAE मध्ये पोहोचले. जिथे जाण्याचा त्यांचा उद्देश यशस्वीरित्या पूर्ण झाला असून, दहशतवाद विरुद्ध पुकारलेल्या या मोहिमेत UAE ची भारतासोबत वचनबद्धता अधोरेखित करण्यात आली आहे. दहशतवादाविरुद्ध भारताचे धोरण आणि ऑपरेशन सिंदूर यावर चर्चा करण्यासाठी शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय शिष्टमंडळ अबू धाबी, UAE येथे पोहोचले आहेत. त्यांनी युएईच्या अधिकाऱ्यांसोबत फलदायी बैठका घेतल्या, ज्यामध्ये युएईची भारताप्रती असलेली वचनबद्धता अधोरेखित करण्यात आली आहे. युएईने भारताला दहशतवादविरुद्ध कार्यात सहकार्य करण्याचे वचन दिले आहे. या बैठकीत काय निर्णय झाला, याबद्दल माहिती देताना शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे म्हणाले, "आमची UAE समकक्षांसोबतची बैठक ही सार्थकी ठरली आहे. आम्ही संरक्षण समितीचे अध्यक्ष अली रशीद अल नुआमी आणि सहिष्णुता मंत्री शेख नाह्यान यांना भेटलो. UAE दहशतवादाविरुद्ध पूर्ण वचनबद्धतेने भारतासोबत खांद्याला खांदा लावून उभा राहणार आहे. युएईने दिलेला संदेश स्पष्ट होता- आम्ही दहशतवादाविरुद्ध लढ्यात भारतासोबत उभे आहोत, आणि दहशतवादाविरुद्ध दोन हात करत आहोत. मला वाटते की हा एक अतिशय महत्त्वाचा संदेश आहे." शिवसेना खासदार पुढे म्हणाले की, "UAE मध्ये जी शांतता आणि समृद्धी आहे, तसेच UAE मध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या, सुरक्षित वाटणाऱ्या भारतीयांची संख्या आणि UAE ज्या पद्धतीने पुढे जात आहे, ते पाहता मला असे वाटते की यूएईसारख्या देशाने या कठीण काळात भारतासोबत खांद्याला खांदा लावून उभे राहणे खूप महत्वाचे आहे. UAE च्या समकक्षांकडून संदेश अगदी स्पष्ट आहे की आम्ही या दहशतवादाविरुद्ध तुमच्यासोबत आहोत. कोणत्याही धर्माच्या नावाखाली दहशतवादाला खतपाणी देता येऊ शकत नाही, असे दोन्ही मंत्र्यांच्या संदेशात स्पष्ट झाले आहे."

### 'दहशतवादाने मानवतेवर हल्ला केला आहे'- श्रीकांत शिंदे

"दहशतवादाचा संबंध केवळ भारताशी नाही, तर मानवतेशी आहे, आणि हाच संदेश जगभरात पोहोचवणे गरजेचा आहे. दोन्ही देशांसाठी आणि शेजारील राष्ट्राच्या प्रगतीसाठी देखील हे महत्वाचे असून, भारतावरील हल्ल्याचा निषेध करणारा युएई हा पहिला देश आहे..." असे श्रीकांत शिंदे यांनी पुढे सांगितले. UAE फेडरल नॅशनल कौन्सिलच्या संरक्षण, अंतर्गत आणि परराष्ट्र व्यवहार समितीचे अध्यक्ष डॉ. अली रशीद अल नुआमी म्हणाले, "दहशतवादाला कोणताही धर्म किंवा राष्ट्रीयत्व नसते. तो संपूर्ण मानवतेसाठी धोका आहे." ते पुढे असे देखील म्हणाले की, "दहशतवाद हा केवळ एका राष्ट्रासाठी किंवा प्रदेशासाठी नाही तर संपूर्ण जगासाठी धोकादायक आहे. आमचा असा विश्वास आहे की आंतरराष्ट्रीय समुदायाने, विशेषतः संसद सदस्यांनी, एकत्र येऊन चांगले भविष्य घडविण्यासाठी रणनीती आखली पाहिजे आणि एकत्र काम केले पाहिजे. ही बैठक दहशतवादाविरुद्ध एकत्रितपणे लढण्याचा आणि आपल्या नागरिकांसाठी आणि प्रदेशासाठी चांगले भविष्य सुनिश्चित करण्याचा आमचा संकल्प प्रतिबिंबित करते."

# सिंदूर पुसण्यासाठी आलेल्यांना मातीत गाडले; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पाकिस्तानला पुन्हा इशारा

विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------



जे सिंदूर पुसण्यासाठी निघाले होते; त्यांना मातीत गाडण्यात आले. ज्यांनी हिंदुस्तानचे रक्त सांडले; आज त्यांचा हिशोब चुकता झाला. भारत गप्प राहील अस ज्यांना वाटत होते ते आज त्यांच्या घरात लपून बसले आहेत. ज्यांना त्यांच्या शस्त्रांचा गर्व होता ते आज त्याच्याच ढिगाऱ्यात गाडले गेले आहेत', असा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यांनी पाकिस्तानला खडे बोल सुनावले. पंतप्रधान मोदी गुरुवारी राजस्थानमधील बिकानेर जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. यादरम्यान त्यांनी देशनोके येथे एका जाहीर सभेला संबोधित केले.' ऑपरेशन सिंदूर'वर बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी (दि.२२) पाकिस्तानवर जोरदार निशाणा साधला. आता भारताची भूमिका स्पष्ट आहे. प्रत्येक दहशतवादी हल्ल्याची पाकिस्तानला मोठी किंमत मोजावी लागेल आणि ही किंमत पाकिस्तानचे सैन्य, पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला मोजावी लागेल,' असा इशाराही त्यांनी पाकिस्तानला दिला. यावेळी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, पाकिस्तान एक गोष्ट विसरला आहे की आता भारतमातेचा सेवक मोदी येथे ताठ मानेने उभा आहे. मोदींचे चित्त शांत आहे, ते शांतच राहते, पण मोदींचे रक्त सळसळते आहे. आता मोदींच्या धमन्यांमध्ये रक्त नाही, तर लखलखता सिंदूर वाहत आहे. आता पाकिस्तानसोबत कसलाही व्यापार आणि चर्चा होणार नाही. आता केवळ पाकव्याप्त काश्मीरवर चर्चा होईल. दहशतवाद नष्ट करण्यासाठी ऑपरेशन सिंदूरने तीन सूत्रे निश्चित केली आहेत. पहिले- जर भारतावर दहशतवादी हल्ला झाला तर त्याला चोख उत्तर दिले जाईल. त्यासाठी वेळ आपले सैन्य निश्चित करेल. दुसरे सूत्र म्हणजे, भारत अणुबॉम्बच्या धमक्यांना घाबरणार नाही. तिसरे - आम्ही दहशतवादाचे सूत्रधार आणि दहशतवादाला आश्रय देणारे सरकार यांना वेगळे समजणार नाही. आम्ही ते एकच आहेत असे मानू. पाकिस्तानचा स्टेट आणि नॉन- स्टेट ॲक्टरवाला खेळ आता चालणार नाही, असे पंतप्रधान मोदींनी सुनावले. दहशतवादाला चिरडून टाकण्याची हीच नीती आहे, हीच पद्धत आहे. हा भारत आहे, नवा भारत आहे. जर पाकिस्तानने दहशतवाद्यांना खतपाणी घालणे सुरू ठेवले तर त्याला हक्काचे पाणी मिळणार नाही. भारतीयांच्या रक्ताशी खेळणे, आता पाकिस्तानला खूप महागात पडेल, असेही ते म्हणाले.

### मोदी का दिमाग थंडा है, लेकीन लहू गरम है

ॲटम बॉम्बच्या धमकीने भारत घाबरणार नाही, आता वार केला तर आम्ही खपवून घेणार नाही. वेळ आणि जागा आमचे जवान ठरवतील. सध्या, जगातील बहुतांश देशात पाकिस्तानची पोलखोल करण्यासाठी आपण विश्वात फिरत आहोत. सर्व पक्षातील नेते या शिष्टमंडळात आहेत. आता, पाकिस्तानचा खरा चेहरा देशाला दाखवू, पाकिस्तान कधीही आपल्याशी सरळ लढूच शकत नाही, म्हणून दहशतवाद्यांना त्यांनी एक हत्यार बनवले आहे. मोदी का दिमाग थंडा होता है, लेकिन लहू गरम है. मोदी के शरीर में लहू नही गरम सिंदूर बेहेता हैं. पाकिस्तान की सेना और अर्थव्यवस्था ये किंमत चुकाएगी, जे हत्यारांवर गर्व करायचे ते आज मृत्यूच्या ढिगाऱ्याखाली दबले आहेत, हा शोध प्रतिशोध नाही तर न्यायाचे नवे स्वरूप आहे. हा आक्रोश नाही तर समर्थ भारताचे रौद्र रुप आहे, नव्या भारताचे स्वरूप आहे, असे म्हणत नरेंद्र मोदींनी पाकिस्तानवर घणाघात केला.


शतायुषी हो बाळा..

दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....

आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह

आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

संपादकीय

# शस्त्रास्त्र उत्पादकांना युद्धांमुळे लाभले बळ

जगातील मंदीसदृश स्थितीचा फटका शस्त्रास्त्र उत्पादकांना बसला आहे. जागतिक बाजारात शस्त्रास्त्र उत्पादकांची उलाढाल कमी झाली होती. गेल्या तीन वर्षांपासून युक्रेन-रशिया, इराण-इस्त्रायल आणि गाझापट्टीमध्ये संघर्ष पेटूनही शस्त्रास्त्र उत्पादनांची मागणी वाढत नव्हती. अशा स्थितीमध्ये भारत आणि पाकिस्तानमध्ये सुरू झालेल्या युद्धामुळे जागतिक शस्त्रास्त्र उत्पादक कंपन्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. शस्त्रास्त्रांच्या बाजारपेठेत बरेच बदल झाले आहेत. संरक्षणशस्त्रांचे उत्पादन करणाऱ्या देशांमधील कंपन्या दलालांना हाताशी धरून आपली निर्यात वाढवत असतात. अमेरिका आणि रशिया हे शस्त्रास्त्र उत्पादनातील आणि निर्यातीतील मोठे खेळाडू होते. भारतासह अनेक देश त्यांच्याकडून शस्त्रे खरेदी करतात. अलीकडच्या काही वर्षांमध्ये भारताने 'मेक इन इंडिया' च्या माध्यमातून शस्त्रास्त्रांच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यावर भर दिला आहे. भारताने केवळ स्वयंपूर्णतेचे उद्दिष्ट ठेवलेले नाही, तर तो आता निर्यातीच्या मार्गावर निघाला आहे. जगातील अनेक देशांना भारत शस्त्रास्त्रे पुरवायला लागला आहे. ही निर्यात २५ हजार कोटी रुपयांपर्यंत गेली आहे. दुसरीकडे, युरोपमधूनही शस्त्रास्त्रांची मागणी कमी झाली आहे. शस्त्रास्त्रांच्या बाजारपेठांमध्ये काहीशी मंदी असल्याने उत्पादक चिंतेत होते. गेल्या तीन वर्षांपासून युक्रेन-रशिया युद्ध, इराण-इस्त्रायल संघर्ष, गाझा पट्टीतील लढा सुरू असूनही शस्त्रास्त्र उत्पादनांची मागणी वाढत नव्हती. जागतिक शस्त्रास्त्र बाजारपेठेत अजूनही अमेरिका अव्वल आहे; परंतु रशियाचा वाटा मात्र घटला आहे. असे असले, तरी भारत-पाकिस्तान युद्धात रशियाची संरक्षण सामग्री ही चीन आणि अमेरिकेच्या सामग्रीपेक्षा उजवी असल्याचे सिद्ध झाले. त्याचा परिणाम आगामी शस्त्रास्त्र विक्रीवर होऊ शकतो. 'स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट' च्या अहवालानुसार, युरोपीय 'नाटो' सदस्य अमेरिकेने पुरवलेल्या शस्त्रास्त्रांवर अवलंबित्व वाढवत आहेत. या पार्श्वभूमीवर शस्त्रास्त्रांच्या जागतिक बाजारपेठेतला सूर दखलपात्र आहे. २०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्यान युरोपीय 'नाटो' सदस्यांकडून शस्त्रास्त्रांची दुप्पट आयात झाली. अमेरिकेने या शस्त्रास्त्रांपैकी ६४ टक्के पुरवठा केला, जो २०१५-१९ च्या तुलनेत (५२ टक्के) लक्षणीयरीत्या जास्त आहे. फ्रान्स आणि दक्षिण कोरिया (प्रत्येकी ६.५ टक्के), जर्मनी (४.७ टक्के) आणि इस्रायल (३.९ टक्के) हे इतर मुख्य पुरवठादार होते. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात रशियाच्या वाढत्या आक्रमक भूमिकेमुळे आणि ट्रान्सअटलांटिक संबंधांमधील तणावामुळे युरोपीयन 'नाटो' देशांनी शस्त्रास्त्र आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि युरोपीयन शस्त्रास्त्र उद्योगाला बळकटी देण्यासाठी पावले उचलली. युरोपीय 'नाटो' देशांनी अमेरिकेकडून सुमारे ५०० लढाऊ विमाने आणि इतर अनेक शस्त्रे ऑर्डर केली आहेत. गेल्या काही काळात अमेरिकेने शस्त्रास्त्र निर्यातीत आपला वाटा वाढवला, तर रशियन निर्यातीत घट झाली. २०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्यान अमेरिकेची शस्त्रास्त्र निर्यात ३५ टक्क्यांवरून ४३ टक्क्यांपर्यंत वाढली. २०२०-२४ मध्ये अमेरिकेने १०७ देशांना प्रमुख शस्त्रे पुरवली. गेल्या दोन दशकांमध्ये २०२०-२४ मध्ये पहिल्यांदाच अमेरिकेच्या शस्त्रास्त्र निर्यातीचा सर्वात मोठा वाटा मध्य पूर्वेला (३३ टक्के) न देता युरोपला (३५ टक्के) गेला. तरीही सौदी अरेबिया अमेरिकन शस्त्रास्त्रांचा सर्वात मोठा आयातदार राहिला. (अमेरिकेच्या शस्त्रास्त्र निर्यातीच्या बारा टक्के). लढाऊ विमानांसारख्या प्रगत लांब पल्ल्याच्या हल्ल्याच्या क्षमतांसाठी अमेरिका हा पसंतीचा पुरवठादार आहे. अमेरिकेच्या तुलनेत, २०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्यान रशियन शस्त्रास्त्रनिर्यातीत झपाट्याने घट झाली. फेब्रुवारी २०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर पूर्ण आक्रमण करण्यापूर्वी ही घसरण सुरू झाली. युक्रेनविरुद्धच्या युद्धामुळे रशियाच्या शस्त्रास्त्र निर्यातीतली घट आणखी वाढली. २०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्यान फ्रान्सने इतर युरोपीय देशांना केलेल्या प्रमुख शस्त्रास्त्रांच्या निर्यातीत जवळजवळ तिप्पट वाढ झाली. हे प्रामुख्याने ग्रीस आणि क्रोएशियाला लढाऊ विमानांचा पुरवठा आणि २०२२ मध्ये रशियाच्या पूर्ण आक्रमणानंतर युक्रेनला शस्त्रास्त्रांचा पुरवठा यामुळे घडले. युरोपियन देशांना फ्रान्समधून १५ टक्के शस्त्रास्त्रे निर्यात झाली. फ्रान्सकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे मिळवणारा कतार हा दुसरा सर्वात मोठा देश होता. २०२०-२४ मध्ये चीन हा शस्त्रास्त्रांचा चौथा सर्वात मोठा निर्यातदार होता. जागतिक शस्त्रास्त्र निर्यातीत त्याचा वाटा ५.९ टक्के होता. चीन शस्त्रास्त्र निर्यात वाढवण्याचे प्रयत्न करत असूनही अनेक मोठे आयातदार राजकीय कारणांमुळे चिनी शस्त्रे खरेदी करत नाहीत. आशिया आणि ओशनिया हे शस्त्रास्त्र आयात करणारे सर्वात मोठे प्रदेश आहेत. २०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्यान आशिया आणि ओशनियातील देशांमध्ये जाणाऱ्या जागतिक शस्त्रास्त्र हस्तांतरणाचा वाटा ४१ टक्क्यांवरून ३३ टक्क्यांपर्यंत घसरला. या प्रदेशातील आयातीत २१ टक्के घट ही मुख्यतः दोन कालावधीत चीनच्या शस्त्रास्त्र आयातीत ६४ टक्के घट झाल्यामुळे झाली. कारण त्यांनी प्रामुख्याने रशियाकडून होणाऱ्या आयातीऐवजी स्थानिक पातळीवर डिझाइन केलेल्या आणि उत्पादित शस्त्रास्त्र प्रणालींवर भिस्त ठेवली. आज चीनच्या देशांतर्गत शस्त्रास्त्र उद्योगाची क्षमता वाढत असताना त्याची शस्त्रास्त्र आयात कमी होत राहण्याची अपेक्षा आहे. जागतिक स्तरावर शस्त्रास्त्रांच्या दहा सर्वात मोठ्या आयातदारांमध्ये आशिया आणि ओशनियामधील चार देशांचा समावेश आहे. ते म्हणजे भारत, पाकिस्तान, जपान आणि ऑस्ट्रेलिया. १९९०-९४ नंतर पहिल्यांदाच चीन पहिल्या दहा शस्त्रास्त्र आयातदार देशांमधून बाहेर पडला. २०२०-२४ मध्ये अमेरिका या प्रदेशासाठी मुख्य पुरवठादार होता. त्यांचा प्रादेशिक शस्त्रास्त्र आयातीत ३७ टक्के वाटा होता. रशिया (१७ टक्के) आणि चीन (१४ टक्के) असा वाटा होता. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा शस्त्रास्त्र आयातदार होता. त्याच्या आयातीला चीन आणि पाकिस्तान या दोन्ही देशांकडून असणाऱ्या धोक्यांचा संदर्भ होता. तथापि, २०१५-१९ ते २०२०-२४ दरम्यान त्याची आयात ९.३ टक्क्यांनी कमी झाली. भारतीय शस्त्रास्त्र आयातीपैकी सर्वात मोठा वाटा (३६ टक्के) रशियाकडून आला, जो २०१५-१९ (५५ टक्के) आणि २०१०-१४ (७२ टक्के) पेक्षा खूपच कमी आहे. २०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्यान पाकिस्तानकडून शस्त्रास्त्र आयात ६१ टक्क्यांनी वाढली. दरम्यान, पुरवठादार म्हणून चीन आणखी प्रबळ झाला. २०२०-२४ मध्ये पाकिस्तानच्या शस्त्रास्त्र आयातीपैकी ८१ टक्के वाटा चीनचा होता, जो २०१५-१९ मध्ये ७४ टक्क्यांवरून वाढला आहे. २०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्यान पूर्व आशियाई देशांकडून शस्त्रास्त्र आयात २२ टक्क्यांनी कमी झाली, चीनकडून शस्त्रास्त्र आयातीत मोठी घट झाली आणि तैवान (- २७ टक्के) आणि दक्षिण कोरिया (- २४ टक्के) यांच्या आयातीत लक्षणीय घट झाली. शस्त्रास्त्रांच्या आयातीमध्ये वाढ करणारा जपान (+९३ टक्के) हा एकमेव पूर्व आशियाई देश होता. युरोप आणि मध्य पूर्वेला शस्त्रास्त्रांची आयात माध्यमांचे लक्ष वेधून घेत असताना आशिया आणि ओशनिया हे २०२०-२४ मध्ये जगातील सर्वात मोठे शस्त्रास्त्र आयात करणारे क्षेत्र राहिले. या प्रदेशातील बहुतेक शस्त्रास्त्र खरेदीमागे चीनशी संबंधित धोक्याची धारणा आहे. मध्य पूर्वेला होणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या आयातीपैकी अर्ध्याहून अधिक आयात अमेरिकेतून (५२ टक्के) झाली तर १३ टक्के इटलीतून, ९.८ टक्के फ्रान्समधून आणि ७.६ टक्के जर्मनीतून झाली. प्रादेशिक संघर्ष आणि तणाव मध्य पूर्वेमध्ये शस्त्रास्त्रांच्या आयातीची मागणी वाढवत आहेत. असुरक्षित युद्ध आणि संघर्षांमुळे पश्चिम आफ्रिकेमध्ये शस्त्रास्त्रांची आयात झपाट्याने वाढली आहे. गेल्या १५ वर्षांमध्ये सुरक्षा परिस्थिती बिघडल्यामुळे पश्चिम आफ्रिकेत शस्त्रास्त्रांचे हस्तांतरण झपाट्याने वाढले आहे. आता भारत आणि पाकिस्तानमधील युद्धाच्या परिस्थितीत जागतिक शस्त्रास्त्र पुरवठादार कंपन्यांना चांगले दिवस येण्याचे स्वप्न पडायला लागले आहे.

# शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या आक्रमतेमुळे आमदारांच्या समितीचा भांडाफोड

## शिवसेना माजी आमदार अनिल गोटे व शिवसेना दाधिकारी यांच्या आक्रमकतेमुळे सापडले एक कोटी ८४ लाख ८४ हजार दोनशे रुपये

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------------------



महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने धुळे जिल्ह्यातील विकास कामांचा आढावा तसेच विकास कामांचे अंदाजपत्रक सादर करण्याकरता महाराष्ट्र राज्य विधिमंडळ आमदारांची समिती तीन दिवसाच्या धुळे जिल्हा दौऱ्यावर आली असता या समितीने धुळे जिल्ह्यातील विविध विभागांच्या प्रशासकीय बैठकांसाठी धुळे शहरापासून तब्बल पाच किलोमीटर दूर असलेल्या अलिशान हॉटेल टॉप लाईन मध्ये पंचतारांकित व्यवस्थेत बैठका घेतल्या यासाठी धुळे जिल्हा प्रशासन तसेच प्रशासनातील कर्मचारी झाडून पुसून उपस्थित होते, सकाळी सुरू झालेल्या या बैठका दुपारपर्यंत सुरू असताना या ठिकाणी अधिकाऱ्यांसह कर्मचारी व आमदार आमदारांसोबत आलेले त्यांचे स्वीय सहायक यांना स्वादिष्ट व रुचकर भोजनाचा आनंद हॉटेल टॉप लाईन मध्ये घेता आला एकीकडे या बैठका सुरू असताना धुळे शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या गुलमोहर येथील शासकीय विश्रामगृहात रूम नंबर १०२ मध्ये या समितीचे अध्यक्ष आमदार यांचे स्वीय सहाय्यक किशोर पाटील यांच्या वतीने काही महत्त्वाच्या मंत्रालयातील कर्मचाऱ्यांसोबत धुळे जिल्ह्यातील विविध विभागातील प्रशासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांकडून पैसे गोळा करण्याचे काम बिनोबा भाट पद्धतीने कोणालाही न घाबरता अगदी बिनधास्तपणे सुरू होते, एकीकडे बैठका सुरू असताना दुसरीकडे गुलमोहर विश्रामगृहात शासकीय वाहनातून अधिकारी पैशांच्या नोटांचे बंडल भरलेले ट्रॅव्हलिंग बॅग या रूम नंबर १०२ मध्ये व तसेच गुलमोहर विश्रामगृहाच्या आरक्षित करण्यात आलेल्या सूटमध्ये जमा करून जात होते. दुपारपर्यंत हे कलेक्शन गोळा करण्याचे काम अगदी बिनधास्तपणे सुरू असताना धुळे शहराचे माजी आमदार अनिल गोटे व उपजिल्हाप्रमुख नरेंद्र परदेशी यांना याबद्दलची माहिती मिळाल्यावर त्यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे महानगरप्रमुख धीरज पाटील यांना ही गोष्ट कानावर घातली, महानगर प्रमुख धीरज पाटील यांनी सर्व शिवसेना पदाधिकारी यांना तातडीने संपर्क साधून गुलमोहर विश्रामगृहात जमावयास सांगितले, तोपर्यंत सायंकाळी पाच वाजेपासून माजी आमदार अनिल गोटे यांनी गुलमोहर विश्रामगृहातील रूम नंबर १०२ चा ताबा घेऊन त्या ठिकाणी ठिय्या नरेंद्र परदेशी व पदाधिकाऱ्यांसोबत मांडला. या संदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी जिल्हा पोलीस अधीक्षक निवासी उपजिल्हाधिकारी तसेच अँटी करप्शन ब्युरो यांना सूचित देखील केले पोलीस अधीक्षकांनी लवकरच येतो असे सांगून येण्यास टाळाटाळ केली, तोपर्यंत त्या ठिकाणी शिवसेना पदाधिकाऱ्यांसह इतर राजकीय पक्षाच्या पदाधिकारी व धुळेकर नागरिकांची गर्दी जमा झाली, तब्बल सहा तास माजी आमदार अनिल गोटे शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे उपजिल्हाप्रमुख नरेंद्र परदेशी महानगर प्रमुख धीरज पाटील, क्षेत्र प्रमुख भरत मोरे, संदीप सूर्यवंशी, एडवोकेट भूषण पाटील, सलीम लंबू, चिलू आवळकंठे, निंबाजी मराठे, सुनील पाटील, राजु ढवळे, आनंद जावडेकर, डॉ.संजय पिंगळे, कपिल लिंगायत, भोला गोसावी, दिपक चुम्बन वाघ, चंद्रकांत हजारे, डॉ. सोमनाथ चौधरी, सचिन रुणवाल, अनिल शिरसाट ,अजय चौधरी, कुणाल कानकाटे ,पिनू सूर्यवंशी, मनोज जाधव, हिमांशु परदेशी, निलेश कांजरेकर, सागर निकम, सचिन रूणवाल, आबा भडांगे , पंकज भारस्कर, संदीप चौधरी, शुभम मतकर, पिंटू ठाकूर डॉ. अनिल पाटील, केतन भामरे ,मुकेश भोकरे ,रोहित भतवाल, अनिल चौधरी ,हर्षल वाणी, बंटी अहिरे, सादिक पठाण, चिलू आवळकंठे, आदी पदाधिकाऱ्यांसह ठिय्या मांडला, या कारवाई संदर्भात प्रशासन टाळाटाळ करत असताना माजी आमदार अनिल गोटे, नरेंद्र परदेशी, एड. भूषण पाटील, धीरज पाटील यांनी विविध अधिकाऱ्यांना मोबाईल वरून संपर्क साधण्याचा प्रयत्न करून माहिती दिली. धीरज पाटील यांनी शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांना मेसेज करून माहिती दिल्यावर खासदार संजय राऊत यांनी तातडीने अनिल अण्णा गोटे यांच्याशी संपर्क साधून माहिती जाणून घेत त्यांच्या ट्विटर अकाउंट वरून घडलेल्या प्रकाराबाबत ट्विट केले, त्यांच्या या ट्विट नंतर प्रशासन खडबडून जागे झाले, रात्री साडेदहाच्या सुमारास प्रशासनातील अधिकारी पोलीस उपविभागीय अधिकारी, बांधकाम विभागाचे अभियंता, महसूल विभागाचे अधिकारी यांच्या नेतृत्वात शासकीय पंच व तसेच तक्रारदार पंच म्हणून शिवसेना उपजिल्हाप्रमुख नरेंद्र परदेशी यांच्या उपस्थितीत रूम नंबर १०२ चे कुलूप कटरने तोडून आत मध्ये प्रवेश करून या रूमची झाडाझडती घेतली, या ठिकाणी नव्याने विकत घेतलेल्या ट्रॅव्हलिंग बॅग तसेच रिकाम्या झालेल्या पाच ते सात ट्रॅव्हलिंग बॅग आढळून आल्या त्यानंतर या रूम मधील कपाट चेक केल्यानंतर एक संपूर्ण कपाट भरून प्लास्टिकच्या काळात थैलीमध्ये नोटांचे बंडलच्या बंडल रचून ठेवण्यात आल्याचे अधिकारी व पंचांना आढळून आले, नोटांचे भले मोठे बंडल आणि थप्प्या पाहून अधिकाऱ्यांनी लागलीच नोटा मोजण्यासाठी नोटा मोजण्याचे मशीन मागवले रात्री अकरा वाजता नोटा मोजायला सुरुवात झाल्यावर रात्री तब्बल तीन वाजेपर्यंत या नोटा मोजण्याचे काम सुरू होते शेवटी तब्बल एक कोटी ८४ लाख ८४ हजार २०० इतकी रक्कम या ठिकाणी मोजण्यात आली. या सर्व रकमेचे बंडल तयार करून तसेच पंचनामा करून स्वतःचा पंचनामा टाईप करून पहाटे साडेचार वाजता अधिकारी व पंचांच्या उपस्थितीत नोटांच्या पाकिटांना व रूम नंबर १०२ ला सिल पॅक करण्यात आले यानंतर पोलीस प्रशासनाने हे सर्व पैसे पोलीस विभागाकडे तीन-तीन भल्या मोठ्या ट्रॅव्हलिंग बॅग मधून पोलीस अधीक्षक कार्यालयात नेले, सदरचा प्रकार गुलमोहर विश्रामगृह येथे सुरू असताना विधिमंडळ आमदारांच्या समितीत आलेले आमदार या समितीचे अध्यक्षांसह सर्वांनी हळूहळू धुळे जिल्ह्यातून धुळे शहरातील ऑफलाईन हॉटेल मधून विविध मार्गाने पळ काढला, या संदर्भात शिवसेना पदाधिकाऱ्यांनी मुंबई आग्रा महामार्गावरील टोल तसेच सोलापूर धुळे महामार्गावरील टोल व सुरत महामार्गावरील टोल वरील सीसीटीव्ही कॅमेरा चे फुटेज देखील प्रशासनाने ताब्यात घ्यावे अशी मागणी केली, तसेच गुलमोहर विश्रामगृहातील सीसीटीव्हीचे फुटेज आदल्या दिवशी सायंकाळी सहा वाजेपासून तर घटनेच्या कालावधीपर्यंत म्हणजे पंचनामा पूर्ण होईपर्यंत पोलीस प्रशासनाने ताब्यात घ्यावी अशी अशी मागणी केली, या संपूर्ण प्रक्रियेचे इलेक्ट्रॉनिक मीडिया तसेच विविध चॅनलचे प्रतिनिधी विविध वर्तमानपत्रांचे धुळे जिल्हा प्रतिनिधी राष्ट्रीय न्यूज चॅनलचे धुळे जिल्हा प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत ही कारवाई सुरू होती तसेच या संदर्भात विविध चॅनेलवर ब्रेकिंग न्यूज देखील सुरू झालेल्या होत्या,

पहाटे साडेचार वाजता पंचनामाचे काम संपून चार वाजून ४.४१ मिनिटांनी पोलीस अधिकारी या ठिकाणाहून बाहेर पडले यावेळी पत्रकारांनी प्रश्न उपस्थित केले असता पोलीस अधिकाऱ्यांनी अधिक माहिती देण्यास टाळाटाळ केली, शिवसेना नेते माजी आमदार अनिल गोटे व शिवसेना धुळे जिल्हा पदाधिकारी यांच्या आक्रमकतेमुळे आमदारांच्या समितीचा भांडाफोड धुळे जिल्ह्यात झाला त्यामुळे प्रशासनातील अधिकारी चांगले धास्तावले असून भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांवरती या प्रकारामुळे चपराक बसणार आहे. याप्रसंगी शिवसैनिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते तर रात्रभर धुळेकर नागरिक देखील या विश्रामगृहाला भेट देऊन सत्यता पाडताळून पहात होते.

# विश्रामगृहात सापडले साडे पाच कोटी? अनिल गोटेंचा खळबळजनक आरोप, खोली क्र. 102 ठरतेय संशयाचा केंद्रबिंदू

## " नोटांचा दौरा की अभ्यास दौरा? "

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-------------------------------

गुलमोहर शासकीय विश्रामगृहातील खोली क्रमांक १०२ मध्ये पाच कोटी रुपये रोख स्वरूपात ठेवून ते विधानमंडळाच्या अंदाज समितीतील आमदारांना वाटण्यासाठी आणले गेले, असा गंभीर आरोप माजी आमदार अनिल गोटे यांनी केल्यानंतर धुळे जिल्ह्यात मोठा खळबळ उडाली आहे. गोटे यांनी स्वतः बुधवारी (२१ मे) दुपारी विश्रामगृहात पोहोचून संबंधित खोलीला बाहेरून कुलूप लावले व त्याठिकाणी ठिय्या दिला. गोटे यांच्या आरोपानुसार, ही खोली अंदाज समितीचे अध्यक्ष आमदार अर्जुन खोतकर यांच्या खासगी सहाय्यक किशोर पाटील यांच्या नावावर १५ मेपासून आरक्षित करण्यात आली होती. पाच कोटी रुपयांची रक्कम विश्रामगृहात ठेवून काही आमदारांना देण्याचा प्रयत्न असल्याचा त्यांचा दावा आहे. गोटेंनी यासंदर्भात जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांच्या उपस्थितीत खोली उघडण्याची मागणी केली होती. गोटे यांच्या आरोपानंतर बुधवारी रात्री उशिरा प्रांताधिकारी रोहन कुवर, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता आर. आर. पाटील आदी अधिकाऱ्यांनी मिळून खोली क्रमांक १०२ चे कुलूप तोडले व 'इन कॅमेरा' तपासणी सुरू केली. या तपासणीसाठी नोटा मोजण्याचे मशिन देखील विश्रामगृहात नेण्यात आले, आणि खोलीत सापडलेल्या नोटांची मोजणी रात्री उशिरापर्यंत सुरू होती. रात्री ११ वाजल्यापासून सुरू झालेला पंचनामा पहाटेपर्यंत चालू होता, अशी माहिती प्रशासनातील सूत्रांनी दिली. या घटनेनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून खोली कशा प्रकारे आरक्षित करण्यात आली, त्यासाठी कोणती शिफारस आली, आधार किंवा पॅन कार्ड देण्यात आले होते का, आणि सहा दिवसांसाठी खोली खासगी व्यक्तीसाठी कशी उपलब्ध करून देण्यात आली – हे अनेक प्रश्न प्रशासनासमोर निर्माण झाले आहेत. गेल्या सहा दिवसांपासून खोलीत राहत असलेले किशोर पाटील नेमके कोण आहेत, यासंदर्भात सुद्धा संभ्रम आहे.






त्यांचा खोलीसंदर्भातील अर्ज कोणाच्या शिफारशीवर मंजूर झाला, याची चौकशी होण्याची मागणी होत आहे. या संपूर्ण घटनेनंतर राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. विरोधकांकडून या घटनेवरून राज्य सरकारवर टीका करण्यात येत असून, पारदर्शक चौकशीची मागणी होत आहे. दुसरीकडे, अंदाज समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर यांनी गोटेंच्या आरोपांचे खंडन करताना सांगितले, “धुळे दौऱ्यानंतर आम्ही विश्रामगृहात गेलेलो नाही. आरोप निराधार असून त्यात काहीही तथ्य नाही.” गोटे हे बुधवार संध्याकाळी सहा वाजल्यापासून खोलीबाहेर ठाण मांडून बसले होते. पावसाच्या सरी सुरू असतानाही त्यांनी जागा सोडण्यास नकार दिला. त्यांच्यासोबत उद्धव सेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, व स्थानिक समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. खोलीत नेमकी किती रक्कम सापडली, त्याचे मूळ काय, ती रक्कम कोणासाठी होती, यासंबंधीची माहिती अधिकृतपणे प्रशासनाकडून अद्याप समोर आलेली नाही. मात्र, तपास पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण प्रकरणावर प्रकाश पडण्याची शक्यता आहे. धुळेतील खोली क्र. १०२ ही आता केवळ एक बंद खोली राहिलेली नसून, ती राज्याच्या राजकीय शुचिता आणि जनतेच्या विश्वासावर उठलेला गंभीर प्रश्न बनली आहे.

# शंभर घरी फिरणारी आहेरातली साडी टोपी उपरणं /टॉवेल अनिष्ट प्रथा बंद करा

## !!! कपड्याच्या आहेराची प्रथा बंद क रा साडी, पातळ, टॉवेल-टोपी, फेटे-उपरणं, शाल ह्या आहेर प्रथा बंद करा !!!

सर्व बंधू-भगिनींनो आपल्या समाजात असो किंवा दुसऱ्या कोणत्याही समाजात असो. ही प्रथा चांगलीच घर करून बसली आहे.लग्नात आहेर द्यावाच लागेल. लोकं काय म्हणतील ? चांगलं दिसत नाही. वगैरे वगैरे. आहेर म्हणजे २०० रूपयाची साड़ी, रुमाल (नेपकिन) टोपी-फेटे, शाली, उपरणे, या वस्तू यामध्ये १० वा, १३ वा, वर्षश्राद्ध या दू:खद प्रसंगी आलेले कपडे सुद्धा असतात, अशी वस्त्रे शुभ/मंगल प्रसंगी वर्ज्य आहेत की ज्या कुणीही कधीच वापरत नाहीत. मग ती टोपी, शाल, फेटा, उपरणे यांचा खर्च सुमारे ३०० रुपये. आपल्या समाजात लग्न, वास्तुशांती, सत्यनारायण पूजा किंवा अशाच कोणत्याही प्रसंगात कपड़े, साड़ी घेऊन जाण्याची प्रथा सर्वांनी आपआपल्या पासूनच बन्द करा व त्या प्रसंगी आयोजन कर्त्यास पुर्वी प्रमाणे रोख आहेर देण्याची प्रथा पाडावी. त्यामुळे आयोजन कर्त्यास व आपल्या समाजास फायदा होऊ शकेल. कोणत्याही प्रसंगी आहेर म्हणून १००, २००, ५००, किंवा १००० रु. ची कपडे, ड्रेस किंवा साड़ी मोठ्या प्रेमाने देतो. परंतु ते कपड़े कुणीही वापरत नाहीत.

आहेर स्विकारणारे हे कपडे पेट्या किंवा कपाट भरुन ठेवतात व पुढच्या प्रसंगी लेनदेन मध्ये तेच कपड़े व साड्या खपवतात.याप्रकारे समय व पैशाची बरबादी शिवाय काहीच मिळत नाही कोणालाही.*जर आपण कपड़े, साडी या ऐवजी रोख आहेर दिले तर लग्न किवा कार्यक्रम करणाऱ्याला ती रक्कम उपयोगी होईल व त्यांना एक प्रकारे मदत केल्यासारखे होईल. आज आपल्या समाजात बरेचसे गरीब परिवार आहेत. त्यांना तर बराच फायदा होईल. आपल्या समाजात लग्न प्रसंगी अंदाजे ९०० ते १००० पाहुणे येतात आणि जर सर्वांनी कपडे घेण्याऐवजी फक्त ५०, १००, २०० ₹ दिल्यास लाखभर रूपये सहज जमतील. कार्यक्रमात रोख पैसे स्वरूपात देणे शक्य नसेल, किंवा ती व्यक्ती लाजून घेत नसेल तर गुगल पे, फोन पे करून त्यांना नकळतपणे आर्थिक मदत करू शकता. आता आपणच सांगा की आयोजन कर्त्यास त्वरित किती मदत मिळेल व तो पैसा लगेच त्यांच्या कामी येऊ शकेल. त्यामुळे आपल्या समाजात कुणालाही लग्नप्रसंगी पैशाची अड़चण असल्यास ती दूर होईल. आणि तिच रक्कम आपण साड़ी किंवा कपड्यांच्या दुकानात देऊन व्यापा-यांचा गल्ला भरतो....? ? ? ? ? आणि तेच व्यापारी आता आपली शेती विकत घेत आहेत ती रक्कम समाजाचेच लोकांनी वापरली तर समाजाचा पैसा समाजातच राहिल व गरीब परिवार कर्जातून मुक्त होईल.आपल्या समाजातील महानुभावांना अनुरोध आहे,,खास करून महिलांना. की ही प्रथा तुरंत बंद करा. आपल्या घरापासूनच याची सुरुवात करू याआपल्या घरी लग्नप्रसंग, वास्तूशांती, सत्यनारायण पूजा असे कार्यक्रम असल्यास आपण आमंत्रण पत्रिकेत खाली एक लाइन जरूर लिहा,कोणत्याही प्रकारचे ( साड़ी कपड्यांचे, भांड्यांचे ) आहेर स्वीकारले जाणार नाहीत* महिलांचा सर्व वेळ आहेर करण्यातच जातो, कार्यक्रम बघायलाच मिळत नाही. त्यानंतर कुणी कपड़े अथवा साड़ी आणल्यास ती प्रेमाने परत करा. घेऊ नका.

**ताजा कलम**

आहेर प्रथा बन्द करण्यात समाजातील सर्व प्रतिष्ठित व्यक्तींनीं समाज प्रबोधन करुन मदत करावी. सर्वांनी आपल्यापासूनच कपडे भांडे यांचे आहेर प्रथा बन्द करुन सुरुवात करावी. लोकं काय म्हणतील ? भाऊबंदांचे नाकावर टिच्चुन लग्न झालं पाहिजे असा बाऊ करुन आपण जो अवास्तव खर्च करून कर्ज फेडण्यासाठीच आयुष्य घालवतो, त्याला आळा घालण्यासाठी पुढाकार घ्या. आपले निर्णय आपण स्वतः घ्या. हा एक छान उपक्रम आहे सर्वांना फॉरवर्ड करा आणि आपण ही नक्की ठरवा कपड्याचा आहेर आज पासुन देणार नाही.

**अविनाश देशमुख**
**सामाजिक कार्यकर्ता / पत्रकार**

# कामठवाडे गावात हनुमंतरायाच्या यात्रेची उत्साहात सांगता कुस्तीच्या मैदानात अंबडचा राज मोरे चांदीच्या गदेचा मानकरी

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------

कामटवाडे येथे गेल्या ७५ वर्षापेक्षाहून अधिक काळापासून परंपरा असलेला हनुमंतरायांचा यात्रोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी घेण्यात आलेल्या कुस्त्यांच्या दंगलीत अंबड गावचा पहिलवान राज रतन मोरे याने मानाची कुस्ती जिंकत चांदीच्या गदेचा मानकरी ठरला. कामटवाडे गावात दोन दिवसीय हनुमान जयंती यात्रोत्सव आयोजित करण्यात आला होता. यात्रोत्सवात निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांचे कीर्तन झाले. रात्री महाराष्ट्रातील भारूड सम्राट राजेंद्र महाराज काळे व सहकारी यांचा भारुडाचा कार्यक्रम झाला.



**राज मोरे व सिन्नरचा रानडे यांच्यात चुरशीची लढत झाली. त्यात राज मोरे हा मानाच्या गदेचा मानकरी ठरला. कै. चिंधू राजाराम मटाले यांच्या स्मरणार्थ चांदीची गदा व रोख पारितोषिक आयोजकांच्या वतीने देण्यात आले.**

पहिलवानाचे व उपस्थितांचे स्वागत माजी नगरसेवक अनिल मटाले यांनी केले. पंच म्हणून प्रतापराव मटाले नंदू गायकर, कमलाकर दिवे, तुकाराम मटाले, छगनराव बंदावणे, संजय मटाले यांनी काम पाहिले. माजी सभापती बाळासाहेब मटाले, राजेंद्र काळे व अ‍ॅड. अतुल सानप यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी तुकाराम मटाले, भाऊसाहेब मटाले, टिकमदास बैरागी, भास्करराव जाधव, रघुनाथ शेजवळ, दामोदर मटाले, योगेश मटाले, विलास मटाले, नरसिंग तोंडारे, विजय मटाले, भाऊसाहेब पवार, यादवराव मटाले, राजाराम मटाले, कामटवाडे ग्रामस्थ उपस्थित होते.

# कांद्याला एकरी दीड लाख रुपये नुकसान भरपाई द्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाची मागणी

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------

अवकाळी व वादळी वाऱ्यासह बे मोसमी पावसाने पिंपळनेरसह साक्री तालुक्यातील कांद्याचे झालेले नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे. त्यामुळे नुकसान झालेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांना एकरी दीड लाख रुपये तात्काळ भरपाई द्या अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पिंपळनेर येथील अप्पर तहसीलदार श्री दत्तात्रय शेजुळ यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.



निवेदनात म्हटले आहे की पिंपळनेर सह साक्री तालुक्यात आठ ते दहा दिवसांपासून सतत येणारा बे मोसमी पावसामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे कांद्याचे फार मोठे नुकसान झाले आहे. बऱ्याच शेतकऱ्यांचा कांदा शेतात सडून गेलेला आहे तर काही शेतकऱ्यांचा कांदा पाण्यातच बुडाला आहे. जगाचा पोशिंदा कसा जगेल असा प्रश्न पडला आहे.


अशा परिस्थितीत कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा कमी दरात विकला जात आहे शेतकरी बांधवांचा खर्च सुद्धा निघत नाही या गोष्टीकडे सरकारचे लक्ष नाही तरी शासनाने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना तात्काळ मदत करावी अशा मागणीचे निवेदन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

यावेळी शिवसेना जिल्हा सन्मयक, रुग्णसेवक श्री किशोर आप्पा वाघ, तालुका समन्वयक ज्ञानेश्वर पगारे, तालुकाप्रमुख तुषार गवळी तालुकाप्रमुख मनोज खैरनार शहर प्रमुख महेश वाघ शहर संघटक अतुल चौधरी उप शहर प्रमुख बाबासाहेब दहिवेल विभाग प्रमुख लक्ष्मण सूर्यवंशी आधी शिवसैनिक व महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री संजय भदाणे, साक्री तालुका अध्यक्ष अनिल भामरे, गंगाधर शिंदे तसेच शिवसेनेचे पदाधिकारी व शेतकरी बांधव उपस्थित होते.

# धुळे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र पडळकर यांची बदली त्यांच्या जागी नवीन जिल्हाधिकारी म्हणून भाग्यश्री पडळकर नियुक्त

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------

-धुळयाच्या जिल्हा अधिकारी म्हणून भाग्यश्री दिलीप विसपुते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या २०१७ बॅचच्या भारतीय प्रशासकीय सेवेत (I A S ) निवड झालेल्या अधिकारी आहेत. त्यांचा जन्म महाराष्ट्रातील मालेगाव येथे झाला असून, त्यांनी आपले शालेय शिक्षण जवाहर नवोदय विद्यालय, नागपूर येथे पूर्ण केले. त्यांनी बी.फार्मसी (B.Pharm) पदवी घेतली असून, त्या चारही वर्षांत



विद्यापीठात अव्वल क्रमांक पटकावला होता .

**UPSC यश आणि प्रशासकीय कारकीर्द**

भाग्यश्री विसपुते यांनी UPSC नागरी सेवा परीक्षा २०१६ मध्ये १०३ वा क्रमांक मिळवून यश मिळवले त्यांच्या प्रशासकीय कारकीर्दीत त्यांनी विविध महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे: सहाय्यक जिल्हाधिकारी आणि प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा, यवतमाळ . मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा. मुख्य प्रशासक, सिडको, छत्रपती संभाजीनगर . मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर . जिल्हाधिकारी, धुळे (मे २०२५ पासून) .

**कोविड-१९ काळातील योगदान**

कोविड-१९ महामारीच्या काळात, त्यांनी नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुणालय (GMCH) येथे कोविड-१९ वॉर रूमच्या प्रमुख म्हणून काम पाहिले. त्या काळात त्यांनी रुग्णालयातील बेड व्यवस्थापन आणि इतर सेवा यांचे निरीक्षण केले. वैयक्तिक जीवन भाग्यश्री विसपुते यांचा विवाह निरज नावाच्या व्यक्तीसोबत झाला आहे. त्यांच्या विवाह सोहळ्याचे फोटो सोशल मीडियावर शेअर करण्यात आले होते. भाग्यश्री विसपुते यांचे शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय आहे. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये प्रशासनिक सुधारणा घडून आल्या आहेत.

# राज्यस्तरीय बैठकीत बांधावरचा एक शेतकरी दाखवा व एक लाख रुपये बक्षीस मिळवा कृषीभूषण श्री ॲड. प्रकाश पाटील

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------

काल मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचे अध्यक्षतेखाली दरवर्षीप्रमाणे खरीप आढावा बैठक पार पडली.या बैठकी अगोदर प्रत्येक तालुक्यात आमदार यांचे अध्यक्षतेखाली व प्रत्येक जिल्ह्यात पालक मंत्री यांचे अध्यक्षतेखाली खरीप आढावा बैठकी पार पडल्या. मुंबईच्या बैठकीत मुख्यमंत्री सोबत दोन्ही उपमुख्यमंत्री,पालक मंत्री, सर्व जिल्हाधिकारी, कृषी संबंधित सर्व अधिकारी उपस्थित होते.या बैठकीत दरवर्षी येणार्या अडचणी पिक कर्ज न देणे,खते टंचाई, बोगस खते, बोगस बियाणे यावर चर्चा होऊन कारवाईचे आदेश झालेत.हेच आदेश दरवर्षी होतात.पण





तरीही त्याच अडचणी दरवर्षी येतात.मग ह्या बैठका कशासाठी घेतल्या जातात.ह्या बैठकांचा विषय व केंद्र बिंदु शेतकरी.पण या राज्य स्तरीय बैठकित एक तरी बांधावचा शेतकरी दाखवा व एक लाख रु बक्षीस मिळवा.उपस्थित राजकिय शेतकरी नेते जरी शेतकरी आहेत, पण ते वेगळ्या उत्पन्नावर करोडपती, अब्जोपती झाले



कृषी भूषण श्री प्रकाश पाटील

आहेत.ते काळ्याचे पांढरे करण्यासाठी शेतकरी झालेलै आहेत. शेतकऱ्यांच्या खर्या अडचणी व त्यावर उपाय योजना बांधावरच्या शेतकऱ्यांना माहीत.पण त्यालाच जर विचारले जात नाही,तर त्याच्या हिताचे निर्णय कसे घेतले जातील. कृषिभूषण ॲड प्रकाश पाटील पढावद धुळे. अध्यक्ष, शासकिय कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी संघ महाराष्ट्र राज्य.



शिवसेना मराठवाडा संपर्कप्रमुख तथा विरोधी पक्षनेते मा.श्री अंबादास दानवे साहेब, शिवसेना नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख मा. बबनराव थोरात साहेब, जिल्हा प्रमुख मा.श्री भुजंगराव पाटील डक साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली युवा सेना उपतालुकाप्रमुख प्रमुख पदी आनंद सुर्यवंशी भुतनहिप्परगेकर यांची नियुक्ती करुन नियुक्ती पत्र शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांच्या निवासस्थानी देऊन सत्कार करण्यात आला व पुढील राजकीय भवितव्यासाठी सुद्धा शुभेच्छा दिल्या.(छाया मनोज बिरादार )

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# पारनेर तालुक्यात पायोनियर कंपनीच्या वतीने शेतकऱ्यांसाठी विशेष कार्यशाळा

## शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



पारनेर तालुक्यात खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी पायोनियर कंपनीच्या वतीने कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील वासुंदे, खडकवाडी, पिंपळगाव रोठा, नांदूर पठार, पाडळी, किन्ही, रायतळे, दैठणे गुंजाळ, सारोळा अटवाई, गोरेगाव, वाळवणे, पिंपरी गवळी, पानोली, कान्हूर, पळशी, वनकुटे, ढवळपूरी, करंडी, चिंचोली, पुनेवाडी आणि पिपळनेर या गावांमध्ये या कार्यशाळा यशस्वीपणे पार पडल्या. या उपक्रमांतर्गत पायोनियर कंपनीचे अधिकारी रणवीर देशमुख, प्रवीण चौधरी, थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन बाजरी आणि मक्याच्या पिकांच्या पेरणीबाबत तांत्रिक मार्गदर्शन करत आहेत.या कार्यशाळांमध्ये पायोनियर ८६M ९४ बाजरी आणि P ३५२४ मका या उत्कृष्ट वाणांच्या पिकांची माहिती देण्यात आली. हे वाण शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय ठरत असून, त्यांच्या उत्पादनक्षमतेमुळे शेतकऱ्यांची पसंती मिळवत आहेत. कंपनीच्या तज्ज्ञांनी पेरणीची योग्य पद्धत, खत व्यवस्थापन, पाणी नियोजन आणि पीक संरक्षणाच्या उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती दिली. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतात मार्गदर्शन मिळाल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे.या उपक्रमाचे तालुक्यातील प्रगतिशील शेतकऱ्यांनी स्वागत केले आहे. खडकवाडी येथील बबन गागरे, वनकुटे येथील सुरेश डुकरे, वासुंदे येथील भास्कर झावरे, मच्छिंद्र वाबळे, पाडळी तर्फे कान्हूर येथील योगेश दावभट आणि पिंपळगाव रोठा येथील दत्तात्रय घुले यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन करण्याचा हा उपक्रम शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. पायोनियर कंपनीच्या या स्तुत्य प्रयत्नांमुळे तालुक्यातील शेतीला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे. अशा उपक्रमांमुळे शेतकऱ्यांचे उत्पादन वाढण्यास आणि शेतीच्या आधुनिकीकरणास चालना मिळेल, असे शेतकऱ्यांचे मत आहे.

> पायोनियर कंपनीचे अधिकारी आमच्या बांधावर येऊन पेरणीची योग्य पद्धत आणि उत्कृष्ट वाणांची माहिती देत आहेत. यामुळे आमच्या शेतीला नवी दिशा मिळेल. उत्पादन वाढीसाठी मदत होणार आहे बाजरी व मका ही उत्तम प्रतीचं वाण आहे.
>
> **मच्छिंद्र वाबळे**
> **(प्रगतिशील शेतकरी, वासुंदे)**

# शेतकऱ्यांनी परवानाधारक कृषी केंद्रातुनच बियाणे व खते खरेदी करा

## कृषी अधिकारी विकास नारनाळीकर यांचे आवाहन

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------



मुखेड तालुक्यातील शेतकरी बांधवांनी शेतीसाठी लागणारी बी - बियाणे खते परवानाधारक कृषी केंद्रातूनच घ्यावे, असे आवाहन मुखेड तालुका कृषी अधिकारी विकास नारनाळीकर यांनी केले आहे. मुखेड तालुक्यासह मुक्रमाबाद, बाराहाळी, जांब परिसरातील सर्व शेतकरी बांधवांना कृषी विभागाकडून आवाहन करण्यात येते की, खरीप हंगाम तोंडावर आलेला असून या हंगामाकरीता लागणाऱ्या सर्व कृषी निविष्ठा (सर्व प्रकारचे बियाणे, खते, औषधी) इत्यादी निविष्ठा तालुक्यातील अधिकृत परवानाधारक कृषी सेवा केंद्र यांच्याकडूनच खरेदी करावे व खरेदी केलेल्या निविष्ठाची अधिकृत बिल पावती घ्या व महत्त्वाचे म्हणजे बाहेर राज्यातील, बाहेर जिल्ह्यातील किंवा बाहेर तालुक्यातील कुठल्याच अनधिकृत एजंट मार्फत खरीप हंगामा करिता लागणाऱ्या कृषी निविष्ठाची (सर्व बियाणे, खते, औषधी) इत्यादी निविष्ठांची खरेदी करू नये. कारण सदरी कृषी निविष्ठा ही निकृष्ट दर्जाची राहू शकते त्यामुळे बियाणे उगवण बाबत, खाते व औषधी यांची पिकाकरिता पुरेसा उपयोग न होणे. याबाबतीत तक्रारी येऊ शकतात. त्यामुळे उत्पादनात घट होऊन परिणामी आपले आर्थिक नुकसान होऊ शकते. वरील बाबतीत मुखेड तालुक्यासह मुक्रमाबाद, बाराहाळी, जांब परिसरातील सर्व शेतकरी बंधूंनी दक्षता घ्यावी, असे आव्हान मुखेड तालुका कृषी अधिकारी विकास नारनाळीकर यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांना कृषि निविष्ठा रास्त भावात मिळावी यासाठी जिल्ह्यात १७ भरारी पथकांची नियुक्ती

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-------------------

जिल्ह्यात खरीप हंगाम २०२५ लवकरच सुरु होत असुन, शेतकऱ्यांना उत्कृष्ट बियाणे, खते व किटकनाशके मिळण्यासाठी बाजारात उपलब्ध होणाऱ्या बियाणे, खते व किटकनाशक विक्रेते व उत्पादक यांच्या नियमित तपासण्या करण्यात येणार आहेत. त्यासाठी नांदेड जिल्हयामध्ये जिल्हास्तरावर एक व प्रत्येक तालुकास्तरावर १६ असे एकुण १७ भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. खरीप हंगामामध्ये कृषिसेवा केंद्रचालक किंवा खाजगी एजंटामार्फत शेतकऱ्यांना निकृष्ट दर्जाचे खते बियाणे व किटकनाशके शेतकऱ्यांना विक्री करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी कृषि विभागाकडुन कृषि सेवा केंद्राची नियमित तपासणी करण्यात येत असते. सर्व निविष्ठांचे व्यवस्थित वाटप व चांगल्या प्रतीच्या निविष्ठा शेतकऱ्यांना मिळतील, शेतकऱ्यांची निविष्ठासाठी अडवणुक होणार नाही यासाठी भरारी पथक काम करणार आहे. त्याचबरोबर कृषि निविष्ठा विक्रीमध्ये गैरव्यवहार, साठेबाजी, ज्यादा दराने विक्री असे गैरप्रकार निदर्शनास आल्यास उत्पादक, विक्रेत्यांचे परवाने निलंबित किंवा रद्य करण्यात येतील. तसेच गैरव्यवहाराचे स्वरुप गंभीर असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा बोगस बियाणे, खते व किटकनाशकांची विक्री केल्यास संबंधिताविरुध्द भरारी पथकामार्फत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार आहेत. तालुकास्तरावर भरारी पथकामध्ये तालुका कृषि अधिकारी, कृषि अधिकारी पंचायत समिती, निरीक्षक वजन व मापे व मंडळ कृषि अधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच जिल्हास्तरीय भरारी पथकात कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड, मोहिम अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड, उपविभागीय कृषि अधिकारी, जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक, वजन मापे निरीक्षक यांचा समावेश करण्यात आला आहे. मागील वर्षात कृषि विभागामार्फत नांदेड जिल्हयात बोगस खते विक्री केल्यामुळे ०३ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. चालू वर्षात एक फौजदारी गुन्हा हिमायतनगर येथे दाखल झाला आहे. बियाण्यांची अनधिकृत विक्री केल्यामुळे एका बियाणे उत्पादकावर फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. तसेच अप्रमाणीत बियाण्यांची विक्री केल्यामुळे उत्पादक व कृषि सेवा केंद्रचालक यांच्या विरुध्द ३२ न्यायालयीन खटले दाखल करण्यात आले आहेत. येणाऱ्या खरीप हंगामामध्ये मोहिम राबवून रॅडमली कृषि निविष्ठा विक्रेते व उत्पादकांच्या तपासण्या करण्यात येणार आहेत. त्यामध्ये अनियमितता आढळुन आल्यास संबंधितांचा परवाना निलंबित अथवा रद्य करण्यात येईल. त्यामुळे कोणत्याही निविष्ठा विक्रेत्यांनी गैरव्यवहार, साठेबाजी, ज्यादा दराने विक्री, बोगस खते बियाणे विक्री करु नये, असे निदर्शनास आल्यास संबंधिताविरुध्द कायदेशीर कडक कार्यवाही करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना निविष्ठा खरेदी करताना काही अडचणी येत असतील किंवा विक्रेत्यांकडून अडवणुक होत असेल तर तात्काळ संबंधित तालुका कृषि अधिकारी किंवा कृषि अधिकारी, पंचायत समिती यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी डी. आर. कळसाईत यांनी केले आहे.

# वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता हवामानशास्त्र केंद्राने दिल्या सूचना

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

--------------------------

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र , मुंबई यांनी २२ मे २०२५ रोजी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी २२ मे २०२५ या एक दिवसासाठी ऑरेंज (Orange) अलर्ट जारी केलेला आहे. या दिवशी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ५० ते ६० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मुसळधार ते अतिमुसळधार स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी. नागरिकांनी खबरदारीची उपाययोजना म्हणून पुढील प्रमाणे काळजी घ्यावी. असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### या गोष्टी करा

विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.

### या गोष्टी करु नका

आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे. असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# दूरदृष्टीचे नेतृत्व, उपक्रमशील कार्यकर्ता म्हणून अनिल पाटीलांची ओळख : खा. अजित गोपछेडे

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------



सामाजिक जाणीव, उपक्रमशीलता आणि लोकाभिमुख दृष्टिकोनातून सतत कार्यरत असलेले नेतृत्व म्हणून अनिल पाटील खानापूरकर यांची ओळख आहे. खानापूरकरांचा ५६ वा वाढदिवस देगलूर येथील बंडयाप्पा मठामध्ये मोठ्या उत्साहात मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सद्गुरु श्री श्री परब्रह्म १०८ सोमलिंग शिवाचार्य महाराज बिचकुंदेकर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून राज्यसभेचे खासदार अजित गोपछडे, माजी सनदी अधिकारी तथा राष्ट्रवादी काँग्रेस दिव्यांग आघाडीचे नेते रामदास पाटील सुमठानकर, प्रसिध्द उद्योजक एकनाथ पवार, आमदार जितेश अंतापुरकर यांच्या मातोश्री शितलताई अंतापूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

खासदार अजित गोपछडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "अनिल पाटील खानापूरकर हे दूरदृष्टी असणारे नेतृत्व आहे. त्यांनी अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवून विकासाचा वेगळा मार्ग तयार केला आहे. त्यांच्या कार्यातून मलाही प्रेरणा मिळाली असून, समाजातल्या विविध प्रश्नांचे समाधान शोधण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. पक्षाच्या वरिष्ठ पातळीवर ते लोकांच्या अडचणी अत्यंत प्रभावीपणे मांडतात, असे खा. गोपछडे यांनी सांगितले." तर अध्यक्षीय आशीर्वचन देताना, सद्गुरु श्री श्री परब्रह्म १०८ सोमलिंग शिवाचार्य महाराज बिचकुंदेकर यांनी म्हणाले की, अनिल पाटील व त्यांच्या सौभाग्यवती अनुराधाताई पाटील यांनी सदैव समाजहितासाठी प्रयत्नशील राहतात. सर्वसामान्य जनतेच्या सुखदु:खात सहभागी होत असतात. त्यामुळे त्यांना येणाऱ्या काळात मोठी जबाबदारी देण्याची मागणी खा. गोपछडे यांच्याकडे केली.

या कार्यक्रमात अनिल पाटील यांच्या कार्याचा विस्तृत आढावा घेण्यात आला.

आजपर्यंत त्यांनी राबविलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक करण्यात आले. रक्तदान शिबिरे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, वृक्षारोपण, विहार, मंदिर बांधकामासाठी मदत, धार्मिक सप्ताहाचे आयोजन, पत्रकारांचा सन्मान, हळदीकुंकूवाचा कार्यक्रम, महिला शिबिरे, अडी-अडचणीत गोरगरिबांना मदत आदीं उपक्रम त्यांनी राबवले आहेत. तसेच त्यांनी भाजपाचे तालुकाध्यक्ष असताना विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका झाल्या त्यात त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. आ. जितेश अंतापूरकरांना विजय मिळविण्यात मोलाचे योगदान अनिल पाटील खानापूरकर यांचे होते.

याप्रसंगी माजी सनदी अधिकारी रामदास पाटील सुमठाणकर यांनी शुभेच्छा देताना म्हटले की, " अनिल पाटील यांची समाजसेवा ही प्रेरणादायी आहे. त्यांची प्रगती ही समाजासाठी एक सकारात्मक ऊर्जा ठरेल, असे ते म्हणाले." यावेळी महेश पाटील (शिवसेना उपजिल्हाप्रमुख), कैलास येसगे (जिल्हा प्रवक्ते काँग्रेस), पंडित वाघमारे गुरुजी, राजेंद्र इंगळे, गौतम वाघमारे यांनी मनोगते व्यक्त केली. तर डॉ. सुनील जाधव व स्वच्छता जागर समितीचे श्री सुवर्णकार यांनी गीत गायन करुन कार्यक्रमात रंगत आणली.

अनिल पाटील खानापूरकर यांच्या वाढदिवसानिमित्त प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीने कार्यक्रम वैशिष्ट्यपूर्ण ठरला. यावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस लक्ष्मण ठक्करवाड, अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा भाजपा जिल्हाउपाध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर, माजी शिक्षण सभापती माधवराव मिसाळे गुरुजी, माजी नगराध्यक्ष शंकरराव कंतेवार, माजी सभापती शिवाजीराव बळेगावकर, माजी समाजकल्याण सभापती जि.प. नांदेडचे ॲड. रामराव नाईक, शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, भाजप जिल्हा उपाध्यक्ष अशोक साखरे, भाजपा किसान मोर्चाचे शिवाजीराव कनकंटे, दिपक शहाणे, वतनवाला वृत्तपत्राचे संपादक दत्ता शिभांले, गुणवंतराव पाटील गंगनबीडकर, बिलोली भाजपा माजी तालुकाध्यक्ष चंद्रशेखर पाटील सावळीकर, भाजपा मंडळ अध्यक्ष उत्तर शिवकुमार देवाडे, भाजपा मंडळ अध्यक्ष दक्षिण ॲड प्रितम देशमुख, भाजपा देगलूर शहराध्यक्ष प्रशांत दासरवाड, जनार्धन बिरादार, ताराकांत पाटील, ॲड श्री कुंचेलीकर, अण्णाराव पाटील, संतोष पाटील, अविनाश पाटील, विठ्ठलराव तरटे, जयदेव केरले, शिवकांत धडेले, शंकरराव रायकोडे, दिगंबर इंगळे, मल्लीकार्जुन पाटील, मधुकर पाटील, श्री डोपेवाड सर, देगलूर तालुक्यातील विविध गावांतील सरपंच, उपसरपंच, पोलिस पाटील, पत्रकार बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. भिमराव दिपके यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद वाघमारे कुशावाडीकर यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार अशोक डुकरे यांनी मानले.

# खतांची उपलब्धता पाहण्यासाठी शेतकऱ्यांनी कृषिक ॲपचा उपयोग करावा कृषि विभागाचे आवाहन

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------

खरीप हंगाम २०२५ लवकरच सुरु होत आहे. शेतकऱ्यांना वेगवेगळया प्रकारची खते बाजारात उपलब्ध आहेत किंवा नाही यासाठी कृषिक ॲप महाराष्ट्र शासनाने तयार केले आहे. या ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आपल्या परिसरातील दुकानात कोणत्या खताचा साठी किती आहे हे या ॲपच्या माध्यमातून कळणार आहे. तरी या ॲपचा उपयोग जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी डी.आर. कळसाईत यांनी केले आहे. कृषिक ॲप डाऊनलोड करण्यासाठी पुढील पध्दतीचा अवलंब करावा. प्ले स्टोअरवर जाऊन कृषिक ॲप सुरुवातीला डाऊनलोड करावे व त्यात चावडी या फोल्डर वर जाऊन खत उपलब्धतता या फोल्डरवर जाऊन क्लीक करावे. त्यानंतर जिल्हा व तालुका निवडावा त्यानंतर सर्व दुकानातील यादी व मोबाईल नंबर, कोणत्या प्रकारचे खत उपलब्ध आहे व ते किती प्रमाणात त्या दुकानात उपलब्ध आहे हे कळण्यास मदत होईल. या ॲपचा उपयोग सर्व शेतकरी बांधवानी घ्यावा, जेणेकरुन आपल्या तालुक्यात किती खत कोणत्या दुकानात उपलब्ध आहे हे कळण्यास मदत होईल.